
बोलणारा मासा

महाभारतातली कहाणी




बोलणारा मासा

महाभारतातली कहाणी


पुनर्कथन : रोज़ी डिकेन्स



मराठी : अश्विनी बर्वे



खूप पूर्वी भारतात मनू नावाचा
एक माणूस राहत होता.




एक दिवस मनू नदीवर गेला.

तेव्हा अचानक एक मासा
पोहत त्याच्या हातात आला.

मासा चंदेरी प्रकाशाने चमकत होता.




“मला मदत कर!” तो म्हणाला.
“मोठा मासा मला खाईन.”



“अरे बिचारा,” मनू म्हणाला.





मनूने आपल्या ओंजळीत
पाणी भरलं आणि तो
मासा त्याने घरी आणला.

त्याने माशाला पाण्याच्या
माठात ठेवलं.



आणि त्याला थोडं थोडं खायला घातलं.

मासा मोठा झाला.






अजून मोठा झाला.




मासा आता माठात मावेना.

मग मनूने माशाला
विहिरीत टाकलं.




आणि त्याला पोळीचे तुकडे
खायला दिले.

मासा मोठा झाला, अजून
मोठा झाला.




मासा विहिरीत पण
मावेना.

मग मनू माशाला नदीत घेवून आला.




मनूने माशाला खायला घातले नाही परंतु...

मासा मोठा होत होता.



मनूचा आपल्या डोळ्यांवर विश्वास बसला नाही.




आता मासा अजून खूप मोठा झाला.

“कृपा करून मला समुद्रावर घेवून चल. माशाने प्रार्थना केली.





मनूला भीती वाटली. “त्याचं वजन एक टन झालं असेल!” त्याने विचार केला.



पण मासा हवे इतका हलका निघाला.

मनू समुद्री किनारी गेला आणि
त्याने माशाला समुद्रात फेकून दिले.






“खूप आभारी आहे,” मासा म्हणाला.



“आता तुला मदत करण्याची माझी पाळी आहे.”

“काही वेळानंतर भीषण पूर येईल.”


“तू सगळ्या प्राण्यांना वाचवण्यासाठी एक मोठी होडी तयार कर.”



मग मनूने एक मोठी
होडी तयार केली.

त्याने होडीत वेगवेगळी रोपं
आणि प्राणी ठेवले.

लवकरच आकाशात भीतीदायक
काळे ढग जमा झाले.




आणि मग जोरात
पाऊस येवू लागला.



एवढा पाऊस पडला की सारी
जमीन पाण्याने भरून गेली.

फक्त मनूचे जहाजच
पाण्यावर तरंगत होते.




जोरात येणाऱ्या हवेमुळे लाटा जहाजाला येवून धडकत होत्या.


“आपल्याला एखादं सुरक्षित ठिकाण शोधायला हवं,” मनू म्हणाला, “नाहीतर आम्ही बुडून जाऊ.”

जेव्हा मनूने अंधारात पाहिलं तर
त्याला चंदेरी प्रकाश दिसला.

तो बोलणारा मासा होता.



माशाने जहाजाला वादळातून खेचलं, खूप वेळ कष्ट घेतल्यानंतर ते एका मोठ्या पहाडाच्या जवळ पोहचले.



माशाचे डोकं वर उचलले गेले..


अचानक माशाचे रूप बदललं.......



“मी ब्रह्म आहे," सगळ्या जीवांची देवता,” ते म्हणाले.

मनूने दीर्घ श्वास घेतला. ब्रम्ह एक शक्तिशाली देवता होते.

“मी तुला यासाठी वाचवलं की,
ज्यामुळे तू परत जग समृद्ध करशील.




“आणि मनू तू इथला राजा होशील.”



" विवेकाने आपलं राज्य चालव," ब्रह्म म्हणाले.

"नक्की," मनू म्हणाला.

मग ब्रह्मा रुपेरी
प्रकाशात विलीन झाले.



त्यानंतर मनूने ब्रम्हाला परत
पाहिले नाही. पण तो देवतेचे
म्हणणे विसरला नाही.

पुरानंतर मनूने जग पुन्हा
वसवण्यासाठी खूप कष्ट घेतले.





मग त्यांनी बाकी काळ तिथं खूप
विवेकशील रीतीने राज्य केले.

या कहाणी विषयी

बोलणारा मासा ही कहाणी प्राचीन भारतीय ग्रंथ महाभारतातून घेतली आहे. हा ग्रंथ दोन हजार वर्ष जुना आहे आणि त्याचे अठरा खंड आहेत.

या कहाणीत भगवान विष्णु एक माशाचे रूप घेवून जगाला प्रलयापासून वाचवतात.

